नि. दिवाणी दावा क्र.१२३/२०१९
निशाणी क्र.२२ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक १ रनधीर विद्यासागर डोंगरदिवे यांचा पुढील सरतपास वादी यांचे विधिज्ञ**

**श्री. टि.ए. शेख यांचे मार्फत शपथेवर पुढे सुरु**

मी माझे पुराव्याचे शपथपत्र सादर केलेले आहे. ते मी वाचलेले असून त्यावर माझी सही आहे ती नि.क्र.२२ वर आहे. प्रतिवादी यां वादमिळकतीच्या संबंधाने उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, प्रकरण क्रमांक आरटीएस ५९/भोकर/६३१८१९ दाखल केले होते. सदर प्रकरणात मी दि.०२.११.२०१९ रोजीची अंतरीम आदेशाची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास नि.क्र. ३४ देण्यात येत आहे. सदर प्रकरणातील अपीलाची प्रमाणीत नक्कल **नि.क्र. ३५** वर आहे. सदर अपीलामध्ये वादी यांनी दाखल केलेल्या जबाबाची प्रमाणीत प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ३६** देण्यात येत आहे. मी तुकाराम गंगाराम क-हाळे यांचेकडून मौजे भोकर येथील गट नंबर २ मधील १हे. ७६ आर जमीन रजीस्टर्ड ताबेइसार पावती दस्त क्रमांक ६२११ दि.०१.१०.२०१८ नुसार करुन घेतली होती. मी सदर रजीस्टर्ड ताबेइसार पावती दस्त क्रमांक ६२११ ची मूळ प्रत अभीलेखावर दाखल केली आहे. त्यावर दस्त लिहून घेणार म्हणून माझी सही आहे व देणार म्हणून तुकाराम क-हाळे यांची सही आहे. सदर दस्तांवर साक्षीदार नंदकिशोर बाहेकर व श्रीकृष्ण जाधव यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे त्यास **नि.क्र. ३७** देण्यात येत आहे. सदर रजीस्टर्ड ताबेइसार पावती दस्त क्रमांक ६२११ वरुन खरेदी दस्त क्रमांक ६९८ दि. २९.०१.२०१९ तयार करण्यात आला. सदर खरेदी दस्त क्रमांक ६९८ दि. २९.०१.२०१९ ची मूळ प्रत अभीलेखावर दाखल केली आहे. त्यावर दस्त लिहून घेणार म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ३८** देण्यात येत आहे.

०२. माझी पत्नी अर्चना वादी क्र.२ हिने तुकाराम गंगाराम क-हाळे यांचेकडून मौजे भोकर येथील गट नंबर २ मधील ८८ आर जमीन रजीस्टर्ड ताबेइसार पावती दस्त क्रमांक ६२१० दि.०१.१०.२०१८ नुसार करुन घेतली होती. मी सदर रजीस्टर्ड ताबेइसार पावती दस्त क्रमांक ६२११ ची प्रत अभीलेखावर दाखल केली आहे. त्यास

ओळखीसाठी **"वस्तु अ"** असे संबोधण्यात येते. सदर रजीस्टर्ड ताबेइसार पावती दस्त क्रमांक ६२१० वरुन खरेदी दस्त क्रमांक ६९९ दि.२९.०१.२०१९ तयार करण्यात आला. सदर खरेदी दस्त क्रमांक ६९८ दि. २९.०१.२०१९ ची प्रत अभीलेखावर दाखल केली आहे. त्यास ओळखीसाठी **" वस्तु ब"** असे संबोधण्यात येते.

०३. मी मौजे भोकर येथील गट क्रमांक २ चा सात बारा उतारा अभीलेखावर दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. ३९** देण्यात येत आहे. मी मौजे भोकर येथील फेरफार क्र. २५३३ व २५३४ ची प्रमाणीत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. ४० व ४१** देण्यात येत आहे. मी अभिलेखावर मौजे भोकर येथील माझे व माझे पत्नीचे नावे असलेले गाव नमुना ८ च्या प्रमाणीत प्रती अभीलेखावर दाखल केल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. ४२ व ४३** देण्यात येत आहे. मी मौजे भोकर येथील गट क्रमांक १ भाग २ चा सन १९७७-१९७८ चा सात बारा उतारा अभिलेखावर दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. ४४** देण्यात येत आहे. मी मौजे भोकर येथील गट क्रमांक २ चा सन १९९२-१९९३ चा सात बारा उतारा अभिलेखावर दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. ४५** देण्यात येत आहे. मी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बुलडाणा येथील दिवाणी अपील क्र. १/२०२० मधील दि. ३०.०७.२०२४ रोजीच्या न्यायनिर्णयाची प्रमाणीत प्रत अभीलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ४६** देण्यात येत आहे. मी मा. अप्पर जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील प्रकरण क्रमांक आरटीएस ५९/भोकर/ १३६/ २१२२ मधील अंतीम आदेशाची प्रमाणीत नक्कल अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ४७** देण्यात येत आहे. मी मौजे भोकर येथील फेरफार क्र. २५३३ ची संगणीकृत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. ४८** देण्यात येत आहे. मी मौजे भोकर येथील खाते क्र.१६८३ चा सन २०२४ चा गाव नमुना क्र. ८ दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. ४९** देण्यात येत आहे. गट क्रमांक २ चा सन २०२४ चा सात बारा उतारा अभीलेखावर दाखल केला आहे. त्यास **नि.क्र. ५०** देण्यात येत आहे.

०४. मी दि. २५.०१.२०१८ रोजी तुकाराम यांनी माझे व माझे पत्नीचे हक्कात ₹.१००/- च्या बॉड पेपर वर इसार पावती करुन दिली होती. त्याची मूळ प्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५१** देण्यात येत आहे. मी अप्पर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे वाद

मिळकतीच्या बाबतीत प्रतिवादीच्या विरोधात दाखल केलेले प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सरतपास पूर्ण

**उलटतपास प्रतिवादी यांचे तर्फे विधीज्ञ श्री. आर. डबल्यू बडगे यांचे तर्फे**

उलट तपासाकरीता पुढील तारीख देण्यात आली.

श्रवणोत्तर स्विकृत,

MEGHA VENKATRAO POUL
Digitally signed by MEGHA VENKATRAO POUL
Date: 2026.04.29 18:20:42 +0530

( श्रीमती एम. व्ही. पौळ )

दि. २९.०४.२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, चिखली